# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
☎ ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com


==========================================================================

जावक क्रमांक – ८२०/९६ दिनांक :- २० जुलै, २०२५

प्रसिद्धिपत्रक

**म्हाडा छत्रपती संभाजीनगर मंडळातर्फे धाराशिवमधील जेवळी व कास्ती बुद्रुक येथे पालकमंत्री श्री. प्रताप सरनाईक यांच्या हस्ते २० हजार वृक्ष लागवडीचा शुभारंभ**

मुंबई, दि. २० जुलै २०२५ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाचा (म्हाडा) विभागीय घटक छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे वन महोत्सव अंतर्गत धाराशिव जिल्ह्यातील जेवळी (ता. लोहारा) व कास्ती बुद्रुक येथे २० हजार वृक्ष लागवडीचा शुभारंभ पालकमंत्री तथा परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांच्या हस्ते आज मोठ्या उत्साहात करण्यात आला.

जेवळी (ता. लोहारा) येथे आयोजित या कार्यक्रमाला माजी खासदार रवींद्र गायकवाड, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे मुख्य अधिकारी दत्तू नवले, जेवळीच्या सरपंच श्रीमती महानंदा पणुरे, उपसरपंच बसवराज कारभारी आदी उपस्थित होते.

जुलै महिन्यात साजरा होत असलेल्या वन महोत्सव निमित्ताने 'म्हाडा'तर्फे राज्यभरात मुंबईसह सर्व विभागीय मंडळांमध्ये वृक्षारोपण मोहिमेला उत्साहात सुरुवात करण्यात आली आहे. सामाजिक बांधिलकीच्या तत्त्वावर गृहनिर्मिती करणाऱ्या 'म्हाडा'ने पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारत दोन लाख झाडांची लागवड करण्याचे मोठे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यानुषंगाने राज्यभरात वृक्ष लागवडीला सुरुवात झाली आहे.

म्हाडातर्फे पहिल्या टप्प्यात मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) क्षेत्रात सुमारे ५०,००० झाडे लावण्याचे काम सुरू आहे. मुंबई मंडळातर्फे ५०,००० व कोकण मंडळातर्फे २५,००० झाडे म्हाडाच्या विविध गृहनिर्माण प्रकल्पांच्या आवारात लावली जात आहेत. पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर व अमरावती या विभागीय मंडळांनी प्रत्येकी २५,००० झाडे लावण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. नाशिक गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे निमोण (ता. चांदवड, जि. नाशिक) येथील जैवविविधता उद्यानात १५,००० झाडे लावण्यात आली. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत उभारण्यात आलेल्या सोलापूर जिल्ह्यातील कुंभारी येथील रे नगर गृहनिर्माण प्रकल्प परिसरात पुणे मंडळातर्फे २० हजार वृक्षांचे रोपण करण्यास सुरुवात झाली आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. ☎ 022-55405066/77. Email : cpromhadaoffice@gmail.com

==================================================

Outward No. : 820/96 Dt. 20th July 2025

# Press Release

## MHADA Chhatrapati Sambhajinagar Board Launches Plantation of 20,000 Trees at Jewli and Kasti Budruk in Dharashiv District

*Inauguration by Guardian and Transport Minister Mr. Pratap Sarnaik | Plantation led by MHADA Vice President & CEO Mr. Sanjeev Jaiswal*

**Mumbai, July 20, 2025** – Reaffirming its commitment to sustainable development and environmental stewardship, the Chhatrapati Sambhajinagar Housing and Area Development Board—an integral part of the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA)—launched an ambitious tree plantation drive under the state-wide *Van Mahotsav* initiative.

The campaign began with the ceremonial planting of 20,000 native trees across two sites—Jewli (Taluka Lohara) and Kasti Budruk in Dharashiv district. The initiative was formally inaugurated with great enthusiasm by Maharashtra's Guardian and Transport Minister, Mr. Pratap Sarnaik, in the presence of esteemed local leaders and citizens.

The event at Jewli saw the participation of distinguished guests, including former Member of Parliament Mr. Ravindra Gaikwad, former MLA Mr. Dnyanraj Chougule, District Collector Mr. Kirti Kiran Pujar, MHADA Vice President and Chief Executive Officer Mr. Sanjeev Jaiswal, Board Chief Officer Mr. Dattu Navale, Sarpanch Mrs. Mahananda Panure, Deputy Sarpanch Mr. Basavraj Karbhari, and other respected dignitaries.

As part of the July *Van Mahotsav* celebrations, MHADA has rolled out a major green initiative across all its regional boards—including Mumbai, Konkan, Pune, Nashik, Nagpur, Amravati, and Chhatrapati Sambhajinagar. Guided by its strong sense of social responsibility, MHADA has set an inspiring goal of planting 2 lakh trees across Maharashtra, creating green urban landscapes for future generations.

In its first phase, over 50,000 trees are being planted across the Mumbai Metropolitan Region (MMR). The Mumbai Board has taken the lead with 50,000 trees, while the Konkan Board is executing plantation drives covering 25,000 trees at various MHADA project sites.

Similarly, each of the Pune, Nashik, Nagpur, Amravati, and Chhatrapati Sambhajinagar Boards has been assigned a target of 25,000 trees. Among the recent milestones, the Nashik Board has successfully planted 15,000 trees at the Biodiversity Park in Nimon (Taluka Chandwad, District Nashik). Meanwhile, the Pune Board has initiated a 20,000-tree plantation at the RAY Nagar Housing Project in Kumbhari, Solapur district, under the Pradhan Mantri Awas Yojana (Urban). Through this collective effort, MHADA aims not only to enhance the environmental fabric of the state but also to foster ecological balance and promote a healthier, greener Maharashtra.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

---

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial




म्हाडा
MHADA
(महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा
येथे २०,००० झाडांचा
वनमहोत्सव अंतर्गत जेवळी व कास्ती बु., ता. लोहारा जि. धाराशिव
वृक्षारोपण सोहळा
मा. ना. श्री. प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक
मंत्री, परिवहन तथा पालकमंत्री, धाराशिव